# प्रास्ताविक — उद्यान विभागाबाबत माहिती

नागपूर शहराला ३०० वर्षा पेक्षा जास्त वर्षाचा इतिहास आहे. या शहराची ओळख " स्वच्छ नागपूर हिरवे नागपूर" आहे. नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडे लहान - मोठी १८२ उद्याने असून मोठी उद्याने २६, मध्यम व लहान १५६ उद्याने आहे. या मधील मोठया उद्यानाचा विकास "Theme based" उद्याने या धरतीवर करण्यात येत आहे. या मध्ये भारत माता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान (Rose Garden), व लता मंगेशकर उद्यान (Flower Garden) म्हणून विकसित करण्यात आले आहे उद्यानाच्या देखभाली करीता झोन निहाय ऐजंन्सी नियुक्त केल्या असून ग्रीन जीम, मुलांच्या खेळणीची दुरुस्ती करीता सुध्दा कंत्राटदार नियुक्त करण्यात आले आहे.

शहरातील हिरवळ वाढाविण्या करीता दर वर्षी रस्तादुभाजका मध्ये **"Green Buffer"** तयार करण्याचे कामे सुरु आहे. नागपूर शहर हिरवे व सुंदर दिसण्याकरीता वृक्षारोपण करण्यात येते या मध्ये प्रामुख्याने मोकळी जागेवर **"Block Plantation"** करुण त्यांची देखभाल करणे तसेच मोठया प्रमाणात नागरिकांना वृक्षांरोपणा करीता दर वर्षी निशुल्क रोपांचे वाटप मोठया प्रमाणात करण्यात येते.

## "उद्यान मित्राची" संकल्पना (Concept)

"उद्यान मित्र" उद्यान विभाग व नागरीकांना मधील समन्वयाकाचे काम करतील. नागरीकांना नागपूर महानगरपालिकेच्या उद्यानात चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळण्याकरीत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मध्ये स्थानिक नागरीक उद्यानाच्या विकासासंबंधी व देखभाल दुरुस्ती विषयी प्रशासनाचा लक्ष वेधू शकतील.

**उद्यान मित्रांचे कामाचे स्वरुप / खाली नमूद कामांमध्ये उद्यानमित्र महानगरपालिकेच्या उद्यान विभागास मदत / सहकार्य करतील.**

१) दैनंदिन उद्यानाची साफसफाई.

२) हिरवळीच्या कामाची देखभाल वर निगराणी.

३) ग्रीन जीम देखभाल / दुरुस्ती.

४) लहान मुलांची खेळणी देखभाल / दुरुस्ती .

५) उद्यानाच्या विकासाची कामे सुचविणे,उद्यानातील फाऊंटेन, स्थापत्य व इतर कामे

६) मासिक बैठकीत सहभागी होणे (शक्य असल्यास) दर महिन्याचे पहिले रविवारला

७) महानगरपालिका कडून वेळोवेळी मागविण्यात येणारे Feed Back Form भरणे.

## उद्यान मित्रांकरीता निवडीचे निकष

१. उद्यान मित्राचे वय २५ ते ८० वर्षा पर्यंत असावे .

२. एका उद्याना करीता एकापेक्षा अधिक उद्यान मित्राची निवड करता येईल.

३. उद्यान मित्र शक्यतोवर उद्यानाच्या (२ kms) परिसरातील रहिवासी असावा.

४. उद्यान मित्रावर गुन्हे दाखल नसावेत (मनपा नागपूर कडून पोलिस व्हेरिफिकेशन करण्यात येईल.)

५. सामाजिक कार्य, किंवा उद्यान शास्त्राचा अनुभव असलेल्यास प्राधान्य देण्यात येईल. अनुभव/ कामाचे प्रमाणपत्र जोडावे .

६. उद्यान मित्राचे कार्यक्षेत्र हे उद्यान देखरेख, स्वच्छता पर्यावरणाशी संबंधीत क्षेत्रात जनजागृती, वृक्ष लागवड, जतन इ. संबधीत महानगरपालिकेला अभिप्राय/ सुझाव देणे क्षेत्रांशी मर्यादीत राहील.

७. उद्यान मित्राला ओळखपत्र देण्यात येईल व त्याची वैधता कमाल ०३ वर्षापर्यंत राहील.

**टिप :- उद्यान मित्राबाबत कोणतीही तक्रार/विवाद उदभवल्यास, अंतिम निर्णयाचा अधिकार मा. आयुक्त, मनपा नागपूर यांचा राहिल.**

**टिपणी :- उद्यान परिसरातील लोकप्रतिनिधी (नगर सेवक) हे पदसिध्द उद्यान मित्र म्हणून कार्यरत राहतील**

# गुगल फार्म

| | | |
|---|---|---|
| १) उद्यानाचे नाव | :- | |
| २) उद्यान मित्राचे नाव | :- | |
| ३) उद्यान मित्राचे वय | :- | |
| ४) राहण्याचा संपूर्ण पत्ता | :- | |
| ५) व्यवसाय /गृहीणी | :- | |
| ६) भ्रमणध्वनी क्रमांक | :- | |
| ७) ईमेल आयडी | :- | |
| ८) अनुभव प्रमाणपत्र (upload) | :- | |

## Feedback Form (अभिप्राय)

| अ.क्र. | उद्यानाचे कामे | शेरा |
|---|---|---|
| १ | दैनदिन उद्यानाची साफसफाई बाबत अभिप्राय. | |
| २ | हिरवळीच्या कामाची देखभाल बाबत अभिप्राय. | |
| ३ | ग्रीन जीम देखभाल / दुरुस्ती. | |
| ४ | लहान मुलांची खेळणी देखभाल / दुरुस्ती. | |
| ५ | उद्यानाच्या विकासाची कामे सुचविणे . | |
| ६ | उद्यानातील फाऊंटेन, स्थापत्य व इतर कामाबाबत सुचना / तक्रारी देणे. | |

विस्तृत स्पष्टीकरण

Form Link:

https://forms.gle/CEEPpV11pcMFA1Lj8